महाज्योती
ज्ञानदीप समतेचा

# महाराष्ट्र शासन

इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022
दुरध्वनी क्रं. 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल mahajyotingp@gmail.com

**जा.क्र.** महाज्योती, नागपूर/आस्था/परिपत्रक /2023/2651 **दिनांक** :-05/12/2023

## -: परिपत्रक :-

**विषय:- महाज्योती मार्फत राबविण्यात येणाऱ्या अर्थ सहाय्य योजनेकरीता पात्र व अपात्र विद्यार्थ्यांची यादी प्रसिद्ध करणेबाबत.**

महाज्योती संस्थेद्वारे महाराष्ट्र राजपत्रित संयुक्त नागरी सेवा (MPSC), (महाराष्ट्र राज्यसेवा, महाराष्ट्र स्थापत्त्य अभियांत्रिकी सेवा, महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा, निरीक्षक कायदेशीर मेट्रोलॉजी, अन्न व औषधे प्रशासन सेवा) पूर्व परीक्षा-2023 उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेकरीता एकरकमी अर्थ सहाय्य प्रदान करण्यासाठी अर्थ सहाय्य योजनेकरिता ऑनलाईन अर्ज दि.09/10/2023 ते दि.20/11/2023 रोजी पर्यंत मागविण्यात आले होते. त्यानुसार महाज्योतीच्या संकेतस्थळावर एकूण-3094 विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेले होते.

प्राप्त अर्जांची व कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. त्यानुसार 1981 विद्यार्थी पात्र ठरलेले आहेत तर 695 विद्यार्थ्यांनी यापूर्वी महाज्योती मार्फत आर्थिक सहाय्य योजनेचा लाभ घेतल्याने अपात्र ठरलेले आहेत. तसेच अर्जात त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या-245 असून त्यांची यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर (www.mahajyoti.org.in) प्रसिद्ध करण्यात येत आहे. अर्जात त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांनी दि.06/12/2023 ते दि.10/12/2023 रोजी पर्यंत त्रुटीची पुर्तता करुन घ्यावी. यानंतर त्रुटी पुर्ततेकरीता मुदतवाढ देण्यात येणार नाही. याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

त्याचप्रमाणे पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांपैकी 173 विद्यार्थ्यांनी सारथी संस्थेकडे देखील अर्ज करुन अर्थसहाय्याचा लाभ घेतलेला आहे. त्यांची यादी सोबत जोडण्यात येत आहे. सदर विद्यार्थ्यांना दुबार लाभार्थी म्हणून अपात्र घोषित करण्यात येत आहे.

(स्वा.)
(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर